परिव० ... आवक ...
क्रमांक २११ ९३८३.
दि. ४।४।२२.
नस्ती क्र. उपप्रआ। आ-२

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसंबधीच्या स्कूल बस धोरणानुसार महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बस करिता विनियम) नियम २०११
जिल्हा स्कूलबस सुरक्षितता समिती गठीत करणे

Notification For Formation of SchoolBus Safety Committee.
Pg - 1.

## महाराष्ट्र शासन

शासन परिपत्रक क्रमांक: एमव्हीआर ०८०८/ प्र.क्र. १५३/परि-२
गृह विभाग , मंत्रालय , मुंबई ४०० ०३२
दिनांक 30 एप्रिल, २०११

शासन परिपत्रक :

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसंबधी महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बस करिता विनियम) नियम २०११ बाबत दिनांक २२/३/२०११ च्या शासन अधिसूचनेअन्वये अंतिम नियम अधिसूचित करण्यात आले आहेत.

२. प्रस्तुत नियमावलीतीन नियम क्रमांक ५ नुसार मुलांची सुरक्षितता आणि शाळेतून त्यांच्या ने-आण करण्याच्या मुद्दयावर चर्चा करुन निणर्य घेण्यासाठी आणि शिफारस करण्यासाठी प्रत्येक जिल्हयाकरिता खालीलप्रमाणे सदस्यांच्या रचनेसह जिल्हा स्कूलबस सुरक्षितता समिती गठीत करण्यात येत आहे:-

१. पोलीस आयुक्त किंवा जिल्हा पोलीस अधिक्षक------------------ अध्यक्ष
२. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या दर्जेपेक्षा कमी दर्जा नसलेल्या त्यांचा नामनिदेर्शित ------------------------- सदस्य
३. महानगरपालिका आयुक्त किंवा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त किंवा महानगर पालिका उपआयुक्ताच्या दर्जेपेक्षा कमी दर्जा नसलेल्या त्यांचा नामनिदेर्शित--------------------------------सदस्य
४. महानगर पालिका परिवहनचा महाव्यवस्थापक किंवा परिवहन व्यवस्थापक-------------------------------------------सदस्य
५. विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ ---------सदस्य
६. मुख्य अधिकारी, नगरपालिका -----------------------------------सदस्य
७. शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक शिक्षण)/ शिक्षण निरिक्षक,मुंबई (मध्य/पूर्व/पश्चिम)------------------------सदस्य
८. शाळा व महाविद्यालय यांचा प्रतिनिधी म्हणून, समितीचा अध्यक्ष प्रत्येक तालुक्यामधून एक व्यक्ती नामनिर्देशित करील--------------- सदस्य
९. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी----------------------------------सदस्य सचिव

Formation of School
Bus Safety Committee
Pg 2

३. मुलांची शाळेत ने-आण करण्यातील सुरक्षितता यांच्याशी संबंधित मुद्याबाबत आढावा घेण्यासाठी व सनियंत्रण करण्यासाठी या समितीद्वारे ६ महिन्यामधून किमान एका बैठकीचे आयोजन करण्याबाबत समितीचे सदस्य-सचिव तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

४. नियमावलीतील नियम क्रमांक ५ (२) मधील तरतुदीनुसार शालेय मुलांची सुरक्षितपणे ने-आण करणे, परिवहन शुल्क, बस थांबे निश्चित करणे याबाबीकडे लक्ष देण्यासाठी **प्रत्येक शाळेने एक परिवहन समिती** गठीत करावयाची असून या समितीद्वारे वाहनांची कागदपत्रे जसे, नोंदणी प्रमाणपत्र, योग्यता प्रमाणपत्र, विमा प्रमाणपत्र, परवाना, वायु-प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र, वाहन चालविण्याचे लायसन्स, अग्निशामक, प्रथमोपचार पेटी इत्यादींची पडताळणी या समितीद्वारे प्रस्तावित केले आहे. तसेच या समितीच्या अध्यक्षस्थानी संबंधित शाळेचे प्राचार्य राहणार असून एक पालक शिक्षक संघाचा प्रतिनिधी, संबंधित क्षेत्राचा वाहतूक निरिक्षक किंवा पोलीस निरिक्षक, या क्षेत्राचा मोटार वाहन निरिक्षक किंवा सहायक मोटार वाहन निरिक्षक, शिक्षण निरिक्षक , बसच्या कत्रांटदाराचा प्रतिनिधी आणि स्थानिक प्राधिकरणाचा प्रतिनिधी यांचा समितीत समावेश करावयाचा असून **३ महिन्यातून एकदा** प्रत्येक शालेय सत्र सुरु होण्याच्या पूर्वी समितीची बैठक घेण्याचेही प्रस्तावित करण्यात आले आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे नियमातील तरतुदीस अनुसरुन पुढील शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी शाळा संहितेतील नियम १६ अंतर्गत शालेय शिक्षण विभागाने नियमावली विहित करण्यासह राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापनास याबाबत तात्काळ अवगत करण्याची कार्यवाही करावी.

५. प्रादेशिक परिवहन अधिकारी /उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी त्यांच्या क्षेत्रातील सर्व शाळा/महाविद्यालय/वाहतूक संघटना/पालक संघटना इत्यादींना प्रसिद्ध केलेल्या नियमावलीबाबत अवगत करण्यासाठी व्यापक स्वरुपात स्थानिक वृत्तपत्र/कार्यशाळा/दूरचित्रवाणी इत्यादी माध्यमाद्वारे प्रसिद्धी मोहिम राबविण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( ज्यो. मा. चव्हाण)**
**उप सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन**

प्रत ,

प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय, मुंबई
सचिव, नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई

E:\tra-२\R.G.GAIKWAD\school bus\Samiti GR.lwp/3

Formation of
School Bus Safety
Committee -
Pg 3

1021

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई
परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व पोलीस आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सह पोलीस आयुक्त,(वाहतूक,) वरळी, मुंबई (नियमावलीच्या प्रतीसह)
महाव्यवस्थापक, बेस्ट, बेस्टभवन मुंबई (नियमावलीच्या प्रतीसह)
प्रोजेक्ट ऑफिसर, एमयुटीपी , हॉर्निमल सर्कल, बोटावाला बिल्डिंग, टाऊन हॉल,
कुलाबा मुंबई (नियमावलीच्या प्रतीसह)
सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक
सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक
शिक्षण निरीक्षक, मुंबई (मध्य/पूर्व/पश्चिम)
सर्व जिल्हा परिषदेचे शिक्षण अधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक)
सर्व महानगरपालिका आयुक्त
महानगर पालिका परिवहन महाव्यवस्थापक
महानगर पालिका परिवहन व्यवस्थापक
सर्व विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
सर्व नगर पालिकांचे मुख्य अधिकारी
सर्व प्राद`शिक परिवहन अधिकारी
सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी
श्रीमती इंद्राणी मल्कानी, सामाजिक कार्यकर्त्या
(नियमावलीच्या प्रतीसह- परिवहन आयुक्त यांच्यामार्फत)
उप परिवहन आयुक्त, (अंमल-१), महाराष्ट्र राज्य, मुंबई

Notification of
Tax Exemption
For School Buses
Pg 1.

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार-ब

वर्ष २, अंक ७०] सोमवार, ऑक्टोबर १८, २०१०/आश्विन २६, शके १९३२ [पृष्ठे ४
किंमत : रुपये २८.००

असाधारण क्रमांक १४०

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

## गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ ऑक्टोबर २०१०

### अधिसूचना

**मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८.**

क्रमांक एमटीए. १७१०/प्र.क्र. २१३/परि-३ –मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ६५) याच्या कलम १३ च्या पोट-कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून आणि शासकीय अधिसूचना, गृह विभाग, क्रमांक एमटीए. १७८९/१५/परि-३, दिनांक २७ जुलै १९८९ अधिक्रमित करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, दिनांक ३० ऑक्टोबर २०१० पासून, या सोबत जोडलेल्या अनुसूचिच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वाहनांना, त्याच्या मर्यादेपर्यंत स्तंभ (३) मध्ये त्या प्रत्येकासमोर अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत उक्त अधिनियमान्वये कर बसविण्यापासून अंशतः सूट देत आहे —

### अनुसूची

| अ. क्र. (१) | मोटार वाहनाचा प्रवर्ग (२) | करातून सूट देण्याची मर्यादा (३) |
|---|---|---|
| १ | शालेय प्राधिकरणाच्या मालकीच्या आणि केवळ स्कूल बस म्हणून वापरण्यात येणाऱ्या स्कूल बस | प्रति वर्ष प्रति आसन रुपये १००/- पेक्षा अधिक असणारा कर |

TAX EXEMPTION — PG 2



| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| २ | शालेय प्राधिकरणाने कंत्राटी पद्धतीने घेतलेल्या आणि केवळ स्कूल बस म्हणून वापरण्यात येणाऱ्या स्कूल बस. | प्रति वर्ष प्रति आसन रुपये १००/- पेक्षा अधिक असणारा कर. |
| ३ | केवळ शाळेतील मुलांची ने-आण करण्यासाठी, शालेय प्राधिकरणाव्यतिरिक्त इतरांची मालकी असलेल्या किंवा कंत्राटी पद्धतीने घेतलेल्या स्कूल बस. | देय असलेल्या वार्षिक कराच्या २/३ इतका कर. |
| ४ | शालेय प्राधिकरणाने कंत्राटी पद्धतीने घेतलेल्या स्कूल बस आणि स्कूल बस म्हणून तसेच शाळेच्या सुट्टीच्या दिवशी किंवा शाळेच्या वेळे व्यतिरिक्त बाहेर नियमित तत्वावर इतर प्रयोजनाकरिता कंत्राटी पद्धतीने वहैन करणाऱ्या स्कूल बस. | संबंधित तिमाहीकरिता लागू असलेल्या तिमाही दराच्या १/३ इतका कर . |
| ५ | शालेय प्राधिकरणाने केवळ त्यांच्या प्रयोजनासाठी कंत्राटी पद्धतीने घेतलेल्या परंतु अन्य कोणत्याही प्रयोजनाकरिता वर्षभरात केवळ एकदाच वापरलेल्या स्कूल बस. | संबंधित तिमाहीकरिता लागू असलेल्या तिमाही दराच्या १/३ इतका कर. |
| ६ | नाटक कंपन्या, लोकनाट्य किंवा तमाशा मंडळे आणि एखादा वाद्यवृंद यांच्या मालकीच्या बस. | लागू असलेल्या वार्षिक कराच्या २/३ इतका कर. |

२. उपरोक्त कराची सूट, संबंधित वाहनाच्या प्रकाराकरिता लागू असलेल्या वार्षिक कराच्या दरास अनुसरून लागू असेल आणि वाहनाचा उपरोक्त विनिर्दिष्ट प्रयोजनाकरिता जोपर्यंत वापर करण्यात येत असेल तोपर्यंत परिणामक असेल.

३. कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने मोटार वाहनांवर कर बसविला असेल तर अशा स्थानिक प्राधिकरणाच्या हद्दीमध्ये वापर करण्याकरिता नोंदणी केलेल्या मोटार वाहनांच्या कराचे दर हे, कराच्या दरांच्या दोन-तृतीयांश इतके असतील आणि संबंधित वाहनांच्या प्रकारांना लागू असलेल्या अशा दरांना अनुसरून, उपरोक्त कराची सूट लागू असेल.

**स्पष्टीकरण**.––या अधिसूचनेच्या प्रयोजनार्थ स्कूल बसच्या शब्दप्रयोगात, मुलांची किंवा विद्यार्थ्यांची ने-आण करण्यासाठीच्या आणि वापर करण्यासाठी व माध्यमिक शिक्षण स्तरापर्यंतच्या शाळेतील मुलांची किंवा विद्यार्थ्यांची ने-आण करण्यासाठी, नोंदणी केलेल्या चारचाकी मोटार वाहनाचा समावेश होतो.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज्यो. मा. चव्हाण,**
शासनाचे उप सचिव.